दै पुढारी [illegible] ऑगस्ट 2003

# कमला महाविद्यालयात निसर्ग मंडळातर्फे कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** कमला महाविद्यालयातील निसर्ग व पर्यावरण जाणिव जागृती मंडळ व पेट्रोलियम कंझर्वेशन रिसर्च असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. अनुराधा सामंत यांचे 'इंधन बचत' या विषयावर व्याख्यान, औद्योगिकरण व पर्यावरण या विषयावर वाद-विवाद आणि इंधन बचतीसंबंधी फिल्म-शोचे आयाजेन करण्यात आले.

वाद-विवाद स्पर्धेमध्ये २४ विद्यार्थिनी सहभागी झाल्या. प्रथम तीन उत्कृष्ट वाद-विवादपटूंना पेट्रोलयिम कंझर्वेशन रिसर्च असिसिएशनतर्फे स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्रके देण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी निसर्ग मंडळाच्या संयोजिका प्रा. नीता धुमाळ, प्रा. रेखा पंडित प्रा. डॉ. सुमित्रा पोवार, प्रा. वर्षा साठे व निसर्गप्रेमी विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

दै पुढारी 30 ऑगस्ट 2003

# परिनिता पोवार, ज्योती रजपूतला प्रत्येकी तीन सुवर्णपदके

**कोल्हापूर :** शहरस्तरीय महिला मैदानी स्पर्धेत परिनिता पोवार व ज्योती रजपूतने प्रत्येकी तीन तीन सुवर्णपदक पटकाविली. परिनिता पोवारने वेगवान धावपटूचा मान मिळविला. जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने शाहू महाविद्यालयाच्या मैदानावर स्पर्धा झाल्या.

शाहू महाविद्यालयाच्या परिनिता पोवारने १००, २०० मीटर धावणे व लांबउडीत प्रथम आला, तर कमला महाविद्यालयाच्या ज्योती रजपूत १५०० मीटर धावणे, गोळाफेक व थाळीफेकमध्ये प्रथम आली.

स्पर्धेचा सविस्तर निकाल असा : (कंसात वेळ व शाळा/महाविद्यालयाचे नाव) - **थाळीफेक** -ज्योती रजपूत (१४.२९ मी., कमला महाविद्यालय), हसीना शेख (१४.१६, शाहू), मेघा पाटील (१२.३६, कमला). **भालाफेक** -श्वेता कोतमिरे (७.१६), मेघा पाटील (६.५५), पल्लवी घाटगे (६.४२, तिघी कमला महाविद्यालय). **उंचउडी** - स्वप्नाली लोहार (१.२८, उषाराजे गर्ल्स हायस्कूल), अमृता व्हटकर (१.१२, शाहू दयानंद), तृप्ती मोगणे (१.०५, उषाराजे). **लांबउडी** - परिनिता पोवार (४.८०, शाहू महाविद्यालय), वासंती पाटील (४.१८, कमला महाविद्यालय), स्वप्नाली लोहार (४.१०, उषाराजे). **४X१०० मीटर रिले** - उषाराजे गर्ल्स हायस्कूल, नूतन मराठी विद्यालय, कमला महाविद्याल. **४X४०० मीटर रिले** - कमला महाविद्यालय, नूतन मराठी विद्यालय. **१०० मी. धावणे** - परिनिता पोवार (१४.५५, शाहू कॉलेज), स्वप्नाली लोहार (१५.३४, उषाराजे), वासंती पाटील (१५.६०, कमला). **२०० मी. धावणे** - परिणिता पोवार (३०.८५, शाहू कॉलेज), मयुरी लाड (३३.५५, उषाराजे हायस्कूल), अमृता व्हटकर (३५.१०, शाहू दयानंद). **४०० मी. धावणे** - अमृता व्हटकर (१.१६.५०), रुकय्या मुल्ला (१.१७.७५, दोघी शाहू दयानंद), सुरेखा शेलार (१.१९.७५, विक्रम हायस्कूल). **८०० मी. धावणे** - नम्रता नाईक (३.८.९०, नु. म. विद्यालय), ज्योती जाधव (३.११.६५, शाहू कॉलेज), शितल मोडे (३.१५.५५, नु. म. विद्यालय). **१५०० मी. धावणे** - ज्योती रजपूत (६.४३.३०, कमला कॉलेज), सोनल भोसले (६.६२.६०, नु. म. विद्यालय), ज्योती जाधव (६.५९.१०, शाहू कॉलेज). **३००० मी. धावणे** - अवंतिका माळी (१८.०४.३०, शाहू दयानंद), सोनल भोसले (१८.१५.२०, ), राजश्री मोरे (१८.४७.९०, दोघी नुतन मराठी). **गोळाफेक** - ज्योती रजपूत (६.१२, कमला कॉलेज), दीपाली पोवार (५.३५, श्रीपतराव बोंद्रे), निलम मेंगाणे (५.१६, नु. म. विद्यालय).

प्रत्येक गटातील विजेत्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. शुक्रवारी ग्रामीण गटातील १६ वर्षाखालील मुले व मुली आणि महिला गटातील स्पर्धा होणार आहेत.